






# श्री महादुर्गेश्वर प्रपत्ती

ॐ

## श्री महादुर्गेश्वर प्रपत्ती

श्रावण महिन्यातील दर सोमवारी सूर्यास्तानंतर फक्त पुरुषांनीच 'श्री महादुर्गेश्वर प्रपत्ती' करावी. ही प्रपत्ती करताना श्रद्धावान वेष (सफेद लुंगी, सफेद सदरा/शर्ट, उपरणे) परिधान करावा. समजा, श्रद्धावान वेष नसेल तर उपरणे परिधान करणे श्रेयस्कर.

ही प्रपत्ती शक्यतो सामूहिकरित्या करावी; मात्र एकट्याने केली तरी चालू शकेल.

**मांडणी:**

- प्रपत्तीची मांडणी पुढीलप्रमाणे करावी –
  चौरंगावर पिवळ्या/पांढऱ्या रंगाचे वस्त्र अंथरावे व त्यावर चण्डिकाकुलाची तसबीर ठेवावी.

त्यासमोर चौरंगावरच त्रिविक्रमाची तसबीर/मूर्ती ठेवावी.

(त्यासह आपल्या आराध्य दैवताची/ सद्‌गुरुची तसबीर/मूर्ती ठेवू शकता.)

**या मांडणीसमोर –**

- पूजकाच्या उजव्या हाताला एक नारळ ठेवावा.
- पूजकाच्या डाव्या हाताला विड्याच्या दोन पानांवर एक सुपारी ठेवावी.
- त्याचबरोबर दीप आणि उदबत्ती ठेवावी.
- आपल्या सुविधेनुसार पवित्र सजावट करू शकता.



**प्रपत्तीच्या तबकातील सामग्री:**

१ उसाचे कांडे, २ लिंबे, १ काकडी, १ गाजर, १ केळे, एका वाटीत पंचामृत (दूध, दही, तूप, साखर, मध), पांढऱ्या आणि पिवळ्या रंगाची फुले, अक्षता.

**प्रपत्ती–विधि:**

१) सर्वप्रथम 'गुरुक्षेत्रम् मन्त्र' ५ वेळा म्हणावा.

२) आता 'ॐ नमो भगवते श्री महादुर्गेश्वराय नमः' हा जप ११ वेळा म्हणावा.

३) आता श्री महादुर्गेश्वर प्रपत्ती कथा वाचावी. (कथा एका श्रद्धावान पूजकाने मोठ्याने वाचावी आणि त्याच्याबरोबर इतर श्रद्धावान पूजकांनी मनातल्या मनात वाचावी.)



ॐ

## श्री महादुर्गेश्वर प्रपत्ती कथा

त्रेतायुगाचा अगदी शेवटचा टप्पा सुरू झाला होता. भारतवर्षामध्ये सर्व राज्यांमध्ये फिरून अत्रि ऋषिंच्या शिष्यांनी सर्व घडी सुरळीत बसविण्याचे कार्य सुरू केले होते आणि सर्व प्रदेशांतील राजांचा व प्रजाजनांचा त्याला अत्यंत सुंदर प्रतिसादही मिळत होता. त्यामुळे द्वापारयुगात शिरणाऱ्या मानवाला नीट तयार केले जात होते व त्यामुळे पुढे कलियुगात शिरणारा मानव अगदीच हीनदीन असणार नव्हता.

परंतु भारतवर्षाच्या ईशान्य भागामध्ये 'भोगपट्टण' नावाचे विशाल राज्य मात्र वेगळेच होते. हे राज्य सर्व प्रकारच्या सुखसमृद्धींनी



भरलेले होते. तेथील राजाने व प्रजेनेसुद्धा भगवान अत्रि ऋषिंच्या शिष्यांना जरादेखील जुमानले नाही व त्यांचे काही न ऐकता त्यांना दुसऱ्या राज्यात पाठवून दिले.

ह्याचा हळूहळू व्हायचा तोच परिणाम झाला. ह्या राज्यातील सर्वजण निरनिराळ्या सुखोपभोगांमध्येच मग्न झाले आणि भक्ती, श्रद्धा, परिश्रम व नीति ह्या चार सद्‌गुणांपासून खूपच दूर गेले. ह्या राज्यातील कुणीही थोडेसेही जास्त श्रम करायला तयार नसत.

हळूहळू भोगपट्टण राज्यातील राजा व प्रजेचा इतर राज्यांतील नागरिकांशी जवळपास सर्वच संपर्क थांबला आणि त्यामुळे येथील लोकांना, बाहेर जगात काय चालले आहे, त्याचा अंदाजच येईना.

असे होता होता राज्यातील प्रत्येक पुरुष आळशी बनत गेला आणि एक दिवस, ह्या राज्याची ही अवस्था पाहून आजूबाजूच्या चार राजांनी ह्या भोगपट्टण राज्यावर जोरदार आक्रमण केले. येथील पुरुषांना लढताच आले नाही. राजाला सर्व प्रजेसकट राज्य सोडून जंगलामध्ये पळावे लागले.

आता खाण्यापिण्याचेसुद्धा हाल होऊ लागले. जवळ धनही नव्हते, कुठली साधनेही नव्हती, कुठली वाहनेही नव्हती आणि मुख्य म्हणजे मनात आशेचा किरणही उरलेला नव्हता.

एका घोर जंगलात ते सर्वजण लपूनछपून राहत होते. त्यांच्यामध्ये एक अतिशय वयोवृद्ध असा शेतकरी होता. तो एकटाच त्या जंगलातील फळे व कंदमुळे शोधून देण्याचे काम सर्वांसाठी



करत असे. त्यानेच, विहिरी कशा खणायच्या, ते शिकविले. परंतु ह्या प्रजाजनांच्या शरीरात व मनात कुठलीही ताकद उरलेली नव्हती. त्यामुळे अत्यंत दुःखाने काही प्रमुख पुरुषांनी त्या वृद्ध शेतकऱ्यास विचारले, ''आम्हाला काहीच का जमत नाही आहे? आम्ही मनाने, शरीराने व बुद्धीने एवढे अशक्त का झालो आहोत? ह्याच्यावर उपाय काय?''

त्या वृद्ध शेतकऱ्याने आकाशाकडे पाहून नमस्कार केला व म्हणाला, ''भगवान अत्रि ऋषि म्हणजे साक्षात परमेश्वरच. त्यांनी त्यांच्या शिष्याकरवी पाठविलेला संदेश न ऐकल्यामुळे तुम्ही सर्वजण असे सत्त्वहीन, शक्तिहीन व बलहीन झाला आहात.

मानवाला सर्व चांगल्या गोष्टी आणि



चांगल्या शक्ति भगवंतच पुरवितो. तुम्ही सर्वजण त्यालाच विसरला आहात.''

त्या वृद्धाचे बोलणे पूर्णपणे पटल्यामुळे त्या सर्व पुरुषांनी प्रश्न केला, ''मग आता आम्ही काय करावे? आमच्यावर परमेश्वराची कृपा कशी होईल?''

तो वृद्ध शेतकरी म्हणाला, ''तुमच्या मनात ही इच्छा उत्पन्न झाली हीच खूप चांगली गोष्ट आहे. मला भगवान अत्रि ऋषिंचा आश्रम माहीत आहे. मी दरवर्षी नित्यनियमाने त्या आश्रमात तीर्थयात्रेसाठी जात असतो. तेथे भगवान अत्रि ऋषिंची पत्नी अनसूया आहे. ही अनसूया साक्षात आदिमाताच आहे. आपल्याकडे वेळ खूप थोडा आहे व गाठीशी थोडेही पुण्य नाही. त्यामुळे आपण सर्वांनी जाऊन आदिमाता अनसूयेचेच



चरण पकडावेत. ती अत्यंत प्रेमळ व साक्षात 'क्षमा' आहे.''

मुसळधार पाऊस पडत असतानासुद्धा सर्वजण त्या वृद्ध शेतकऱ्याच्या नेतृत्वाखाली भगवान अत्रि ऋषिंच्या आश्रमामध्ये जाऊन पोहोचले. संपूर्ण मार्गभर 'श्री अनसूया विजयते' हा जप करीतच चालले होते. परंतु प्रत्येकाच्या मनात शंका होती - 'आपल्याकडे काही पुण्य नसताना आदिमाता अनसूया आपल्यावर प्रसन्न होईल काय?'

परंतु आगळेच घडले. आदिमाता अनसूया आश्रमाच्या प्रवेशद्वारातच उभी होती व त्या सर्वांना पाहून म्हणाली, ''माझ्या नातवंडांनो! तुमची सर्व स्थिती मला कळली आहे. तुम्ही खूप हालअपेष्टा भोगल्यात. तुमचा जप मला

पोहोचला आणि तुमच्या मनातील शंकाही कळली.

परंतु जराही काळजी करू नका. मानव कितीही चुकला, तरी जोपर्यंत तो राक्षसी होत नाही, तोपर्यंत मी त्याला मदत करीत राहतेच.

आज श्रावणमास सुरू झाला आहे व आज सोमवार आहे. मी ह्या वृद्ध शेतकऱ्याला ७० वर्षांपूर्वी शिकविलेली 'महादुर्गेश्वर प्रपत्ती' तुम्हाला देण्याची त्याला आज्ञा करते. दर श्रावण सोमवारी ती निष्ठेने करताच तुमची दुःखे व दुर्बलता दूर होऊ लागतील व तुम्ही जे त्रेतायुगातच कलियुगात जाऊन पोहोचला आहात, ते कलिच्या प्रभावातून मुक्त होऊन परत एकदा बलसंपन्न व सुखसंपन्न व्हाल.



मात्र सर्व ठीक झाल्यानंतर उतू नका, मातू नका आणि घेतला वसा टाकू नका.''

एवढे बोलून आदिमाता अनसूया अंतर्धान पावली व तो आश्रमही दिसेनासा झाला. तिचे हे अद्‌भुत सामर्थ्य पाहून अत्यंत प्रभावित व आनंदित झालेल्या त्या सर्वांनी आदिमातेच्या नावाचा जयजयकार केला व नंतर त्या वृद्ध शेतकऱ्याकडून 'महादुर्गेश्वर प्रपत्ती' स्वीकारली व त्या महिन्यातील पाचही सोमवार, सर्वांनी एकदिलाने व सहकार्याने प्रपत्ती केली.

सांगायलाच नको! वेगवेगळ्या अद्‌भुत घटना घडत गेल्या आणि ते सर्वजण परत एकदा मनाने व शरीराने बलवान झाले. त्यांना त्यांचे राज्यही परत मिळाले व सर्व सुखेही.

तो वृद्ध शेतकरी मात्र पुढे सर्व भारतवर्षामध्ये



भ्रमण करीत राहिला व 'महादुर्गेश्वर प्रपत्ती'चा प्रचार व प्रसार करीत राहिला.

तो आजदेखील 'हरिहरदास' ह्या नावाने जेथे जेथे श्रद्धावान आहे तेथे तेथे फिरत राहतो कारण केवळ श्रावणात नव्हे, तर दर सोमवारी प्रपत्ती व अत्रि-अनसूयेची भक्ती करीत राहिल्यामुळे तो अजर अमर झाला.

---

४) नंतर द्वादश-ज्योतिर्लिंग आरती म्हणावी. आरती करताना समोर ठेवलेला दीप प्रज्वलित करावा. आरती करताना दीप आपल्या हातात घेऊ नये, तबकातील सामग्रीसह तबक ओवाळून आरती करावी. (आरती सीडी किंवा अन्य साधनांवर लावली तरी चालू शकेल.)



## आरती:

जय देव जय देव जय गौरीहरा
हतप्रभ राक्षस पाहूनी दिव्य तुझ्या त्रिशूला,
दिव्य तुझ्या त्रिशूला

मंत्र अवघे तुझिया डमरुचे स्वर
नामे अवघी तुझिया गंगेचे सूर
पूजन मंत्रोच्चारे घे पावन करूनी,
घे पावन करूनी

शूलपाणि रुद्रा, श्रीसिद्ध रुद्रा,
स्वरयोगी रुद्रा, मणिभद्र रुद्रा
ज्योतिर्लिंग रुद्रा लिंगेश्वर रुद्रा
गंगा शिरा धरिसी तू तारक भद्रा

ओवाळू आरती श्री गौरीहरा,
ओवाळू आरती श्री गौरीहरा
हतप्रभ राक्षस पाहूनी दिव्य तुझ्या त्रिशूला,
दिव्य तुझ्या त्रिशूला


५) आरतीनंतर १२ प्रदक्षिणा कराव्या. १२ प्रदक्षिणा करताना हा गजर करावा – **'बम् बम् भोलेनाथ बम् बम् भोले'**. उपस्थित सर्वांनी हा गजर करावा.

६) १२ प्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर तबकातील पांढऱ्या आणि पिवळ्या रंगाची फुले त्रिविक्रमास अर्पण करावीत.

७) पूजा झाल्यावर अक्षता अर्पण कराव्या, हात जोडून नमस्कार करावा. तबकातील अन्य सामग्री आपल्या घरी घेऊन जावी. नारळ, केळे आणि अन्य सामग्रीचे घरातील सर्वांनी प्रसादरूपात सेवन करावे.





## प्रपत्तीच्या तबकातील सामग्री

• १ उसाचे कांडे • २ लिंबे • १ काकडी • १ गाजर
• १ केळे • एका वाटीत पंचामृत (दूध, दही, तूप, साखर, मध)
• पांढऱ्या आणि पिवळ्या रंगाची फुले • लहान वाटीत अक्षता